# अनुसंधात्यांच्या[1] अभिनतीचा[2] सामग्री-संग्रहणावर परिणाम

सुलभा ब्रह्मे

कोणत्याहि सामाजार्थिक अवीक्षणांत संग्रहित केलेल्या सामग्रीचें विश्लेषण करून, तिच्या आधारें कांहीं निष्कर्ष काढण्यापूर्वीं, संग्रहित सामग्री विश्वसनीय असल्याची खात्री करून घेणें आवश्यक असतें. समक्षकार[3] रीतीनें माहिती गोळा केली असतां प्रश्नावलीची रचना व अनुसंधात्यांचें प्रशिक्षण यांवर सामग्रीची विश्वसनीयता प्रामुख्यानें अवलंबून असते. अर्थात् प्रश्नावली काळजीपूर्वक तयार करून व प्रश्नावलींतील प्रश्नांची व्याप्ति, शब्दांच्या व्याख्या इत्यादि गोष्टी अनुसंधात्यांस सविस्तरपण समजावून सांगितल्या असूनहि प्रत्येक प्रश्न काळजी-पूर्वक विचारणें, जरूर तर प्रश्नांच्या अर्थाचें विवरण करणें, त्याची व्याप्ति समजावून सांगणें या सर्व बाबतींत अनुसंधात्यांनीं कांटेकोरपणानें व सावधगिरीनें काम केलें तरच विश्वसनीय माहिती मिळूं शकेल. प्रश्नावलीमध्यें वास्तवलक्षी प्रश्न विचारले असूनहि अनुसंधात्यांच्या अभिनतीचा परिणाम सामग्री-संग्रहणावर होण्याचा संभव असतो. अनुसंधात्यांच्या अभिनतीचा सामग्रीवर काय परिणाम होतो हें प्रस्तुत लेखांत अभ्यासिलें आहे.

पुणें शहरांत, १९५५ सालीं वस्त्र-व्ययविषयक अधीक्षणांत संग्रहित केलेल्या माहितीचा या लेखांत उपयोग केला आहे. या अधीक्षणांत एका वर्षाच्या अवधींत कुटुंबांतील प्रत्येक व्यक्ती-साठीं वस्त्रक्रयावर केलेला व्यय, वस्त्राची मात्रा, गुण इत्यादिविषयीं तपशीलवार माहिती ५४५ न्यादर्श कुटुंबांकडून समक्षकार रीतीनें घेतली होती. समक्षकारासाठीं पांच अनुसंधात्यांची नियुक्ति केली होती. प्रस्तुत विश्लेषणासाठीं, एकूण अधीक्षित कुटुंबांपैकीं ज्या कुटुंबांमध्यें कुटुंब-प्रमुख अप्रवीण किंवा प्रवीण हस्तश्रमिक होता व ज्या कुटुंबांमध्यें दोन ते सातपर्यंत व्यक्ति होत्या अशींच कुटुंबें विचारांत घेतलीं आहेत. हेतु हा कीं, निरनिराळ्या अनुसंधात्यांनीं अवलोकिलेलीं कुटुंबें समरूप असावीं. प्रत्यक्ष विश्लेषणास आरंभ करण्यापूर्वीं कुटुंबांतील व्यक्तींची संख्या, कौटुंबिक आय व कुटुंबाची जात या बाबतींत वरील कुटुंबें समरूप[4] आहेत काय तें पाहिलें. कारण, या बाबींवर कुटुंबांची वेषपद्धति व वस्त्रव्यय प्रामुख्यानें अवलंबून असतो. अधीक्षणासाठीं नियोजित केलेल्या 'य', 'र', 'ल', 'व', 'श' या पांच अनुसंधात्यांनीं अवलोकिलेलीं अनुक्रमें ३०, ३१, २७, ३७ आणि २४ अशीं एकूण १४९ कुटुंबें पुढील विवेचनामध्यें विचारांत घेतलीं आहेत. निरनिराळ्या अनुसंधात्यांनीं अवलोकिलेल्या कुटुंबांच्या आकारांचें मध्यक[5] व प्रमाप विचलन[6], तसेंच कौटुंबिक आयाचें मध्यक खालीं दिलें आहे.

१. अनुसंधाता - investigator
२. अभिनति - bias
३. समक्षकार - interview
४. समरूप - homogeneous
५. मध्यक - mean
६. प्रमाप विचलन - standard deviation